सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०६ /२०१४-२०१५

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरूवार दिनांक १९/०३/२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरीं सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०२/२०१५ रोजीची तहकूब सभा दि.२५/०२/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या हद्दीतील सांगली येथील सरस्वतीनगर मधील श्री.अरविंद बजाज यांचे घरापासून ते श्री.दिलीप आरवाडे यांचे घरापर्यंत असणाऱ्या श्री अष्टविनायक गणपती मंदिर व श्री नरसिंहसरस्वती दत्त महाराज मंदिर या रस्त्याला श्री.गणपती दत्त मंदिर मार्ग असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२१/०२/२०१५ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील पोलीस हेडकॉर्टर्सची जागा जेथे संपते तेथे येणारा पूर्व पश्चिम रस्ता जेथे विश्रामबाग-कुपवाड या दक्षिणोत्तर रस्त्याला स्वामी विवेकानंद चौक असे नाकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२१/०२/२०१५ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेच्या सांगली येथील बालमंदिर शाळा क्र.२ त्रिकोणी बाग ही शाळा लग्न कार्य व इतर कार्यासाठी भाडेने देताना र.रु.७०००/- प्रतिदिनी व साफसफाई र.रु.३०००/- असे एकूण र.रु.१०,०००/- मात्र भाडे आकारणेस मान्यता देणेबाबत **सहा.आयुक्त (बालमंदिर विभाग) यांचे दि.०९/०३/२०१५ चे विषयपत्र.**

... २ ...

७. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत मिरज धुयारी गटर योजना टप्पा क्र.२ योजनेंतर्गत समावेश नसलेल्या तथापि मागणी असलेल्या वॉर्ड क्र.९,१२,२५ आणि २९ या भागामध्ये मलनि:सारण वाहिन्या तसेच, सर्व्हीस चेंबर रोड क्रॉसिंग इत्यादीचा सुधारीत प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर करणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (जलनि:सारण अभियंता) यांचे दि.०४/०३/२०१५ चे विषयपत्र.**

८. मनपा ई-गव्हर्नन्स प्रकल्पाचे थर्डपार्टी सिस्टीम सेक्युरिटी ऑडिट करणेकामी महासभा ठराव क्र.४४१ दिनांक २०/०३/२०१३ अन्वये AAA टेक्नॉलॉजी यांची नियुक्ती करणेत आली होती. सदर ऑडिट करणाऱ्या मक्तेदार यांनी सादर केलेला अहवाल व अभिप्राय स्विकारणेस मान्यता देणेबाबत **उपायुक्त (संगणक विभाग) यांचे दिनांक ०९/०३/२०१५ चे विषयपत्र.**

९. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाची मा.सहसंचालक स्थानिक निधी लेखापरिक्षण,नविमुंबई यांचेकडून करणेत आलेल्या लेखापरिक्षणामध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील एकूण १७१ आक्षेपांचा लेखापरिक्षणाचा अनुपालनाचा अहवाल अवलोकनी घेवून, निर्णय घेणेबाबत **मुख्यलेखापरिक्षक तथा उपायुक्त यांचे विषयपत्र.**

१०. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

११. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६/२०१४-१५

महापालिका सभा दिनांक १९/०३/२०१५ करीता.

गुरुवार दि.१९/०३/२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या सर्व विभागाचा कारभार हा अधिनियमान्वये चालतो. पण त्यामध्ये नमुद नसलेले नियमाकरीता प्रत्येक विभागाचे उपविधी तयार करणे आवश्यक असतात. तत्कालीन नगरपालिकेचे उपविधी सद्या उपयोगात आणले जात आहेत. नव्याने उपविधी तयार करुन मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. मंजूर उपविधी आधारे नागरीकांना येणाऱ्या समस्या सोडविण्याकामी योग्य धोरण तयार होणे आवश्यक आहे. सद्या मनपाच्या अनेक विभागाचे उपविधी तयार नाहीत. त्या कारणास्तव अनेक कायदेशीर समस्या निर्माण होत असतात. उदा.पाणी पुरवठा विभागाकडील बंद कनेक्शन तोडण्याची कारवाई मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडील उंच होल्डींग,बॅनर परवाने,आरोग्य विभागाकडील व्यवसाय नाहरकत दाखले परवाने तसेच, नगररचना विभागाकडील बांधकाम परवाने, हार्डशिप इत्यादी बाबी उपविधी तयार नसल्याने स्पष्ट स्वरुपात नियम काय आहे यांचे अकलन होत नाही.

मा.आयुक्त व उपायुक्त यांचे नियंत्रणाखाली प्रत्येक विभाग प्रमुख तसेच नगरसचिव यांचे मार्फत सर्व विभागाचे उपविधी तीन महिन्याच्या कालबद्ध नियोजन तयार करुन मा.महासभेस सादर करुन मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेकामी नियोजन होणेसाठी आलेला प्रस्ताव.

२. मा.सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मिरज शहरातील मध्यवर्ती असलेल्या महात्मा गांधी उद्यानामधील लाईट व्यवस्था फार खराब होवून उद्यान अंधारात गडप होत आहे. सदर उद्यानामध्ये शाळेची लहान मुले, महिला व जेष्ठ नागरीक मोठ्या संख्येने सायंकाळी फिरावयास येतात. या उद्यानामध्ये असणारी लाईट व्यवस्था खराब झालेली आहे. त्यांना लाईट नसल्याने या उद्यानात गैरसोय होत आहे. उद्याना लगत मिरजेची चावडी व महापालिका कार्यालय अशी महत्वाची कार्यालये आहेत. तरी अंधाराचा गैरफायदा घेवून कोणतेही गैरकृत्य होवू नये यासाठी त्याठिकाणी लाईट व्यवस्था त्वरीत दुरुस्त करणे गरजेचे असलेने, सदर कामी संबंधीतांना सत्वर आदेश होणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची मिरज शहरातील ऑक्सीडेंटल प्लॅट (कत्तलखाना जवळील) येथील अंदाजे ३० एकर जमीन प्रत्येक तीन वर्षासाठी भाडे तत्वावर जाहिर लिलाव करुन कसण्यासाठी देणेत येत होती.सदर शेत जमीन कसण्यासाठीची मुदत संपलेली आहे. तरी सदर जमिनीचा कसण्यासाठीचा लिलाव काढला गेलेला नाही. सद्या सदरची जमिन ही पडीक पडलेली आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडत आहे. सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब झालेली असलेने, महापालिकेला आर्थिक उत्पन्नाची गरज आहे. असे असताना सदर नमुद जमीन कसण्यासाठी न दिलेने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी सदर जमिन कसणेस देणेसाठी महापालिका प्रशासनाचे काय धोरण आहे. याबाबत अद्याप जाहिर लिलाव काढण्यात आलेला नाही याची माहिती सभागृहास होणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव महापालिकेच्या आर्थिक हिताशी संबधीत असलेने, सदरकामी संबंधीतांना सत्वर आदेश होणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील हॉटमिक्स रस्त्यांचे टेंडर भरताना २०किमी चे आत हॉटमिक्स प्लांट असणे आवश्यक आहे. अशी अट निविदा काढण्यात येत असताना निविदेत नमुद केली असते. सदरची अट रद्द करण्यात यावी. सदर अट रद्द केल्याने छोटे ठेकेदार सुद्धा निविदा भरतील त्यामुळे मोठ्या ठेकेदारांची मक्तेदारी संपून त्यांचेत स्पर्धा निर्माण होवून महापालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. सदर कामी संबंधीतांना सत्वर आदेश होणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १६/०३/२०१५.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १५६

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/०२/२०१५ रोजीची तहकूब सभा दि.२५/०२/२०१५ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. १३८ ते ठराव क्र.१५५ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर,

महासभा विषयक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १५७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नुतन मा. महापौर विवेक आप्पा कांबळे यांनी महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारणेच्या दृष्टीकोनातून महापालिका प्रशासक म्हणून कठोर निर्णय घेवून, महापालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांचेकडून एल बी टी वसुलीसाठी व्यापाऱ्यांचे दारात बँडबाजा वाजविण्याचा धडक उपक्रम सुरु करुन एल बी टी वसुलीकामी केलेल्या कार्यवाहीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.महापौर विवेक आप्पा कांबळे यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.पद्मिनीदेवी दिगंबर जाधव

अनुमोदक :- मा.निर्मला राजेंद्र जगदाळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- ३५८

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२१/०२/२०१५ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सरस्वतीनगर मधील श्री.अरविंद बजाज यांचे घरापासून श्री.दिलीप आरवाडे यांचे घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यास श्री.गणपती दत्त मंदिर मार्ग असे नामकरण करणेस सूचना व हरकती मागविणेकामी महासभा ठराव क्र.१२५ दि.०३/१२/२००४ अन्वये महासभेने निश्चित केले धोरणानुसार मान्यता देणेत आली होती. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदेन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्रस्तुत कामी सूचना व हरकती प्राप्त न झालेने महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील सरस्वतीनगर मधील श्री.अरविंद बजाज यांचे घरापासून ते श्री.दिलीप आरवाडे यांचे घरापर्यंतच्या रस्त्यास श्री.गणपती दत्त मंदिर मार्ग असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.धनपाल तात्या खोत यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सांगली शहरातील सह्याद्रीनगर परिसरातील दत्त मंदिर लगत असलेली महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेस कै.माजी आमदार भगवानराव सुर्यवंशी यांचे नाव देणेस महानगरपालिकेने निश्चित केले धोरणानुसार योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी त्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच, सदर जागेवर उद्यान विकसीत करणेकामी आभाळमाया फॅब्रेशन यांनी स्वखर्चाने विकसीत करणेची तयार दर्शविली असून, याकामी सविस्तर अहवाल मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- [illegible]

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [illegible]

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १५९

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२१/०२/२०१५ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सांगली येथील पोलीस हेडक्वॉर्टसची जागा जेथे संपते तेथे येणारा पूर्व पश्चिम रस्ता जेथे विश्रामबाग - कुपवाड या दक्षिणोत्तर रस्त्याला स्वामी विवेकानंद चौक असे नामकरण करणेस सूचना व हरकती मागविणेकामी महासभा ठराव क्र.१२५ दि.०३/१२/२००४ अन्वये महासभेने निश्चित केले धोरणानुसार मान्यता देणेत आली होती. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवदेन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्रस्तुत कामी सूचना व हरकती प्राप्त न झालेने महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील पोलीस हेडक्वॉर्टसची जागा जेथे संपते तेथे येणारा पूर्व पश्चिम रस्ता जेथे विश्रामबाग - कुपवाड या दक्षिणोत्तर रस्त्याला स्वामी विवेकानंद चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- मा. जगन्नाथ ठोकळे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. दिलीप पाटील. महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६०

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (बालमंदिरविभाग) यांचे दि.२१/०२/२०१५ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.६

तत्कालीन सांगली नगरपरिषद अस्तित्वात असताना सांगली नगरपरिषदेची बालमंदिर शाखा क्र.२ त्रिकोणी बाग ही शाळा ठराव क्र.१८० दि.२०/०२/१९९९ पासून माहे मे महिन्यामध्ये व दिपावलीच्या सुट्टीमध्ये लग्न समारंभ व इतर लहान-मोठ्या समारंभांना प्रति कार्यक्रम भाडेपोटी र.रु.१०००/- व स्वच्छतेपोटी रु.५००/- अशी अनामत रक्कम भरुन घेवून कार्यक्रमासाठी भाड्याने दिली जात होती. सदरची रक्कम आकारली जात असली तरी, समारंभ झालेनंतर स्वच्छता करुन दिली जात नाही, अन्न कचरा, बक्षीस पॅकिंगचे कागद, द्रोण,पत्रावळ्या, कागदी ताटे,वाट्या शाळेमध्ये व शाळेच्या आवारामध्ये विस्तुत प्रमाणात विस्कटलेली असतात. समारंभाचेवेळी दरवाजा,खिडक्या,त्यांची मोडतोड होत असल्याने इमारती देखभाल दुरुस्ती खर्चामध्ये वाढ होत आहे ही बाब विचारात घेवून, महानगरपालिकेच्या त्रिकोणी बाग बालमंदिर शाळा क्र.२ समारंभ कार्यासाठी भाड्याने देताना भाडे र.रु.७०००/- प्रतिदिनी प्रति कार्यक्रम व साफसफाई र.रु.३०००/- मात्र असे एकूण र.रु.१०,०००/- मात्र याप्रमाणे प्रतिदिनी प्रति कार्यक्रमास आकारणेस प्रशासनाने शिफारस केली आहे. सदर विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही समारंभ कार्यासाठी रु.५०००/- व साफसफाईसाठी र.रु.२०००/- असे एकूण र.रु.७०००/- मात्र प्रतिदिनी याप्रमाणे कार्यक्रमास आकरणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेची त्रिकोणी बागेजवळ बालमंदिर शाळा क्र.२ भाड्याने देणेकामी वरील प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, सदर बाल मंदिरमध्ये स्वच्छतागृहराची कोणतीही व्यवस्था नसलेने, समारंभासाठी आलेल्या नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. तसेच, बागेमध्ये पहाटेच्या वेळी व सायंकाळच्या वेळी जेष्ठ नागरीकांसह इतर नागरीकही फिरावयास येत असतात ही बाब विचारात घेवून सदर ठिकाणी तात्काळ स्वच्छतागृह बांधणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ ठोकळे ठराव सर्वानुमते मंजुर

मुख्याधिकारी

अनुमोदक :- मा.दिलीप पाटील महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६१

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०४/०३/२०१५ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत मिरज भुयारी गटार टप्पा क्र.२ आणि सांगली भुयारी गटार टप्पा क्र. २ या प्रकल्पास सदर योजनेंतर्गत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रकल्प महापालिका क्षेत्रामध्ये सुरु आहे. महानगरपालिकेच्या मिरज भुयारी गटार टप्पा क्र.२ या योजनेत समावेश नसलेल्या तथापि, सदर भागातील मागणी असलेल्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्याबाबत वॉर्ड क्र.९,१२,२९आणि वॉर्ड क्र.२५ या भागातील भागांचा समावेश करुन प्रकल्प अहवाल सादर करणेस मान्यता देणे विषयी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुतचा विषय निर्णयासाठी महासभे समोर ठेवला असता, प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये चर्चा झाली. चर्चेनुसार मिरजे प्रमाणे सांगली भुयारी गटार योजनेत समावेश नसलेल्या तथापि, सदर भागातील मागणी असलेल्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्याबाबत सदस्यांनी मागणी केलेली असलेने, प्रस्तुतचा विषय फेर प्रस्तावासाठी ही सभा परत पाठवित आहे.

सूचक :- मा.दिलीप पाटील

अनुमोदक :- मा.जगन्नाथ ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

जलनिस्सारण अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६२

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (संगणक विभाग) यांचे दि.०९/०३/२०१५ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने यापूर्वी राबविलेल्या ई-गव्हर्नन्स् प्रकल्पाचे थर्डपार्टी टेक्निकल ऑडिट करणेकामी महासभा ठराव क्र.४४१ दि.२०/०३/२०१३ अन्वये दिनांक २१ मे २०१३ रोजी नेमलेल्या AAA Tech.Ltd. यांनी प्रशासनाकडे दिनांक १६ जुलै २०१३ रोजी सादर केलेला तांत्रिक अहवाल व सदर अहवालाचा दिनांक १६/०१/२०१५ रोजी सादर केलेला अंतिम सारांश या सभेपुढे स्विकारणेबाबत सादर करणेत आलेला असून ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

AAA Tech. या कंपनीने दिनांक १६ जुलै २०१३ रोजी लेखापरिक्षण अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये Information System Audit Report, Executive Summary (११ पाने) व Gap Anylisis Audit Report (७३ पाने) व Annexure १ to ४० एकूण १४६३ पाने या नुसार अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये (Summary of Observations) HCL कंपनीस करारान्वये एकूण ४५७४ इतक्या मुद्यांबाबत लेखापरिक्षण करणाऱ्या कंपनीने Complience केलेला नव्हता. या ११९२ मुद्यांपैकी HCL कंपनीने ६४१ मुद्यांबाबत लेखापरिक्षण कालावधी मध्ये Complience केला व ३९ मुद्दे हे not applicable (मनपा विभागास आवश्यक असे नसलेले) व उर्वरित ५१२ मुद्दयांचा Complience केला नाही असे लेखापरिक्षण करणाऱ्या कंपनीचे म्हणने आहे. तसेच या लेखापरिक्षणाच्या अहवालातील निष्कर्षामध्ये HCL कंपनीने करारानुसार करावयाच्या कामगिरीपैकी ८७.९२% कामगिरी पूर्ण केली असल्याचे नमुद केले आहे.

यानुसार लेखापरिक्षण करणाऱ्या कंपनीने अंतिम निष्कर्ष अहवाल तयार करुन मनपास सादर केला होता.

तद्नंतर सदर अहवालाच्या अनुषंगाने AAA Tech. या कंपनीने दिनांक १६ जानेवारी २०१५ रोजी अंतिम निष्कर्ष अहवाल तयार करुन मनपास म्हणने सादर केले आहे. त्यानुसार कंपनीने पुढील प्रमाणे अंतिम व विस्तुत सारांश अहवाल सादर केला आहे.

1. The agreement was entered into by SMKC with HCL on 02/03/2009 for 10 years and the audit was conducted during May to July 2013 i.e. after 1 period of more than 4 years after agreement with HCL.
2. As per our Gap Analysis Report] HCL has not complied with 164 probes (tast cases) out of 335 probes (tast cases) as per their agreement during the 1 audit resulting in non compliance of 48.96% . The compliances were done only after 1 audit, Such non compliances may be existing for more than 4 years i.e. from 02/03/2009 till date of audit

... २ ...

3. As per our Information system audit report, HCL has has not complied with 1028 probes (test cases) out of 4239 probes (test cases) as per best security practiees during the 1 audit resulting in non compliance of 24.25%. During the compliance audit 512 probes (test cases) out of 1028 probes (test cases) out of 1028 probes (test cases) were still not complied resulting g in non compliance og 49.81% of the nc non compliances reported in the 1 audit.

4. As mentioned in our report, In our opinion, the project is feasible subject to the following factors.

    a) If the number of employees employed by HCL falls below 30
    b) The cost incurred o hardware is less than 310 Lakhs.
    c) The number of transactions exceed the number of transactions expected"

या अहवालानुसार प्रथम लेखापरिक्षणापर्यंत म्हणजे माहे मे २०१३ ते जुलै २०१३ या कालावधी अखेर एचसीएल कंपनीने ४९.८१% इतकी करारानुसार कामगिरी केल्याचे निष्पन्न होत आहे व त्यानंतर जुलै २०१३ अखेर लेखा परिक्षण करणाऱ्या कंपनीने काढलेल्या Queries व घेतलेल्या आक्षेपानुसार HCL कंपनीने त्याची पुर्तता ८७.९२% केले आहे असे स्पष्ट होत आहे.

या अहवालावरील मनपा प्रशासनाचे मत व सभेमध्ये झालेली चर्चा यानुसार मनपा ई-गव्हर्नन्स् प्रकल्पाचे तांत्रिक लेखापरिक्षण करणाऱ्या AAA Tech.Ltd. कंपनीने दिनांक १६/०१/२०११५ रोजी सादर केलेला अंतिम अभिप्राय / निष्कर्ष ही सभा अवलोकनी घेत असून, अंतिम अभिप्राय व निष्कर्षानुसार ई-गव्हर्नन्स् प्रकल्प राबविणाऱ्या HCL कंपनीने करारपत्रानुसार जुलै २०१३ अखेर फर्स्ट ऑडिट अहवालानुसार ४९.८१% एवढे कामकाज केल्याचे सिद्ध होत आहे असे या सभेचे मत आहे त्यानुसार या प्रकल्पाचे अनुषंगाने पुढील योग्य व प्रशासकीय कार्यवाही मा.आयुक्त, सांगली मिरज आणि महानगरपालिका यांनी करावी असे ही सभा निर्णय घेत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सिस्टीम मॅनेजर

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६३

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (मुख्यलेखापरिक्षक) यांचे दि.०९/०१/२०१५ चे विषयपत्र व त्यावरील स्थायी समिती ठराव क्र.२१४ दि.१५/०१/२०१५ चा अवलोकनी घेणेत आला.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ या वित्तीय वर्षाची मा.संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षक नवि मुंबई यांचेकडून लेखापरिक्षण सन २०११-१२ चे लेखापरिक्षण करणेत आले आहे. लेखापरिक्षणामध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील एकूण ११७ आक्षेप घेणेत आलेले आहेत. सदर लेखापरिक्षणाचा अनुपालनाचा अहवाल अवलोकनी घेणेकामी स्थायी समिती ठराव क्र.२१४ दि.१५/०१/२०१५ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार विषयांकीत प्रस्ताव महासभेच्या निर्णयासाठी विषयपत्रिकेवर ठेवला असता, प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेनुसार सदर लेखापरिक्षण अहवालाच्या प्रति सदस्यांना अगोदर अभ्यासासाठी वितरीत करणेत याव्यात व त्यानंतर सदरचा विषय सभागृहासमोर ठेवण्यात यावा दरम्यानचे काळात विषयांकीत प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ लोकरे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.दिलीप पाटील.

महापौर,

मुख्य लेखापरिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (लेखाविभाग) यांचे दि.१७/०३/२०१५ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस १३ व्या वित्त आयोगाच्या सन १३-१४ सालातील दुसऱ्या हप्त्याचे अनुदान र.रु.६,३४,८४,४२३/- मात्र दि.२९/०९/२०१४ रोजी ऑनलाईन प्राप्त झालेले असून, १३ व्या वित्त आयोगाच्या अनुदानाच्या विनियोगाबाबत मा.शासनाने दि.२५ आक्टोंबर २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार अनुदानाचा विनियोग करण्याचा आहे. त्यानुसार दि.१७/०३/२०१४ रोजी मा.आयुक्तसो यांचे दालनात मा.महापौर यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाकडून खालील प्रमाणे विनियोगाबाबत प्रस्ताव सादर झालेला आहे.

१. आरोग्य विभाग	-	१,५०,००,०००/-
२. बांधकाम विभाग	-	१,५०,००,०००/-
३. UIDSSMT (थकीत बिले)	-	१,८०,००,०००/-
४. पाणी पुरवठा (गॅस्ट्रो साथ उपाययोजना)	-	३८,००,०००/-
५. पाणी पुरवठा	-	६६,००,०००/-
		६,३४,००,०००/-

उपरोक्त प्रस्तावातील रु.१.८० कार्टीची रक्कम UIDSSMT योजनेच्या थकीत बिलापोटी व र.रु.३८ लक्ष मात्रची रक्कम मा.आयुक्त मंजूरी आदेश क्र.६६९ दि.०५/०३/२०१५ नुसार वर्ग करण्यात आलेली आहे. तथापि, पाणी पुरवठा,गॅस्ट्रो साथ उपाययोजना अंतर्गतची कामे अद्याप पूर्ण झालेली नसल्याने, त्यासाठी आत्ताच तरतुद करणे आवश्यक नसलेचे या सभेचे मत आहे. सबब, पाणी पुरवठा, गॅस्ट्रो साथ उपाययोजनासाठीचे रु.३८ लक्षचा निधी व पाणी पुरवठा विभागासाठी प्रस्तावित केलेला रु.६६ लक्षचा निधी बांधकाम विभागाकडे वर्ग करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत असून, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागासाठी र.रु.२,३३,००,०००/- मात्र होणाऱ्या तरतुदी मधून सदर अनुदानातून खालील कामगिऱ्या प्रस्तावित करणेत येत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजे र.रु.
१.	मिरज येथील गांधी चौक ते आल्फोन्सा स्कुल पर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरी करणे.	१,०५,००,०००/-
२.	सांगली येथील जुना कुपवाड रोड, चैत्रबन चौक ते कलव्हटे ते जवाहर हौसिंग सोसायटी व जुना कुपवाड रोड कलव्हर्ट ते मंगळवार बाजार चौक ते अहिल्यादेवी होळकर चौक पर्यंतचा रस्ता डांबरी करणे.	६०,००,०००/-
३.	बौद्ध वसाहत मिरज येथे सभागृह बांधणे	२८,००,०००/-
४.	मिरज येथील गणेश तलाव सुशोभिकरण करणे.	४०,००,०००/-

... २ ...

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक साधन सामुग्री अपुरी पडत असल्याने, घनकचरा व्यवस्थापनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. शहरातील कंटेनर खराब झालेले असून, कंटेनर अभावी कचरा गोळा करणे अडचणीचे झाले आहे. याबाबत सन्मा.सदस्यांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी वाढत असलेने, आरोग्य विभागासाठी कंटेनर, फिरती शौचालये, फायबर मुताऱ्या इत्यादी र.रु.१,५०,००,०००/- मात्र मधून खरेदी करण्यात यावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेतली असता, कंटेनर,फिरती शौचालये आणि फायबर मुताऱ्या खरेदी करणेकामी जाहिर निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा प्राप्त होवून निविदा मंजूर होणेस दिनावधी लागणार आहे. सदरचा निधी सन २०१३-१४ साठी उपलब्ध झाला असलेने, सदरचा निधी मार्च पूर्वी खर्ची पडणे आवश्यक आहे. यासाठी सदरची खरेदी भारत सरकार यांचे केंद्रीय भांडार अंतर्गत दरकरार असलेले न्यु साई फायबर,मिरज यांचेकडून दरकरारानुसार खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विभागीय कार्यालय मिरज येथील गणेश तलावाचे सुशोभिकरण करणेची कामगिरी बांधकाम विभागाकडून ७५% पूर्ण झाली असून, सदरची कामगिरी २५% अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. सबब, सदरची गणेश तलाव सुशोभिकरण करणेची कामगिरी या कामाचे मंजूर मक्तेदार श्री.चंद्रकांत हुडेद यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणारा खर्च या अनुदानातून करणेस हो सभा मान्यता देत आहे.

तसेच, महापालिकेच्या कार्यशाळा विभागाकडे आवश्यकती नविन वाहने खरेदी करणेकामी र.रु.२१,००,०००/- मात्र वर्ग करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार १३ व्या वित्त आयोगाचा निधी खालील प्रमाणे वर्ग करणेत यावा.

मुख्य लेखा परिक्षक
वैद्यकीय अधिक्षक
शहर अभियंता
कार्यकारी अभियंता
योगिकी अभियंता

१. आरोग्य विभाग	-	१,५०,००,०००/-
२. आरोग्य अंतर्गत रस्ते	-	५०,००,०००/-
३. बांधकाम विभाग	-	२,३३,००,०००/-
४. UIDSSMT (थकीत बिले)	-	१,८०,००,०००/-
५. कार्यशाळा विभाग (नविन वाहने खरेदी)	-	२१,००,०००/-
		६,३४,००,०००/-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

१३ व्या वित्त आयोगाचा निधी उपरोक्त विभागानिहाय वर्ग करणेत येत असून, त्यानुसार प्रशासनाने पुढील योग्यती कार्यवाही सत्वर ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.विनिय पाटील,

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे मालमत्ता व्यवस्थापक यांचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सांगली येथील स.नं.३८८/२ अ/१ मधील खुली जागा क्षेत्र ७०४.७८ चौ.मी.गुंठेवारी अंतर्गत ले आऊट मधील खुली जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. सदरची जागा शिव हार्दिक ग्रीन एकर्स अपार्टमेंट ओनर्स सोसायटी सांगली यांनी भाड्याने मिळणेची मागणी केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ क नुसार महानगरपालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजूरीने भाड्याने देता येते किंवा अभिहस्तांतरीत करता येईल अशी तरतुद आहे. तसेच, कलम ७९ ड नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणतीही हक्क विकता येईल भाडे पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद आहे. त्यानुसार सदर जागेचे भाडेमुल्य सहाय्यक संचालक नगररचना विभाग,सांगली यांचेकडून निश्चित करुन घेतली असून, वार्षिक भाडे र.रु. १२,४७५/- इतके होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर रेखांकनातील अनेक खुल्या जागा महापालिकेच्या ताब्यात असून, अशा खुल्या जागा विकसीत करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे महानगरपालिकेस दुरापास्त आहे. तसेच, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेतली असता, अशा सर्व खुल्या जागा विकसीत करणे महानगरपालिकेस अशक्यप्राय आहे. परिणामी अशा खुल्या जागेवर अतिक्रमण होवून अस्वच्छतेमुळे शहरास तसेच, आजूबाजूच्या रहिवाशांना दुर्गंधीचा उपद्रव सहन करावा लागतो. अशा खुल्या जागा रेखांकनातील सोसायटी, फेडरेशन ऑफ सोसायटीज् नसल्यास रेखांकनातील भूखंड धारकांच्या सहमतीने सार्वजनिक मंडळे,संस्था, विश्वस्त यांना सामाजिक कार्यास वाहून घेतलेल्या संस्थांना दिल्यास महापालिकेस हातभार लागेलच शिवाय उपरोक्त परिस्थिती उद्भवलेस प्रतिबंध येईल.

शिव हार्दिक ग्रीन एकर्स अपार्टमेंट ओनर्स सोसायटी यांना मागणी केलेप्रमाणे स.नं.३८८/२अ/१ मधील ७०४.७८ चौ.मी.खुल्या जागेपैकी

(अ) तळमजल्यावर १०% व पहिल्या मजल्यावर ५% असे एकूण १५% बांधकाम क्षेत्राचे मर्यादीत मनोरंजन या अंतर्गत जीम, टेबल टेनीस, इन्डोअर खेळासाठी इमारत अनुज्ञेय असेल

(ब) रेखांकनातील खुल्या जागेच्या एकूण क्षेत्राच्या १५% इतकेच बांधकाम अनुज्ञेय असेल

(क) खुले क्षेत्र देखभाल व नागरीकांना खुले ठेवणे बंधनकारक राहिल.

... २ ...

महाराष्ट्र नगर विकास विभाग यांचेकडील क्र.टिपीबी ४३९६/११४/प्र.क्र.८९/९६/नवि-११ दि.१० जून १९९६ महानगरपालिकेस / नगरपालिकेस हस्तांतरीत झालेली खुली जागा असल्यास महानगरपालिका / नगरपालिका सदरची जागा अभिन्यासातील भूखंडधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस/ फेडरेशन ऑफ सोसायटीज् यांना शर्ती व अटी घालून भाडे करारावर देवू शकेल किंवा स्वतः विकसीत करु शकेल असे शासनाचे निर्देश आहेत.

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेतली असता, शिव हार्दिक ग्रीन एकर्स अपार्टमेंट ओनर्स सोसायटी यांनी स.नं.३८८/२ अ/१ मधील ७०४.७८ चौ.मी.खुल्या जागेपैकी ले आऊट मधील खुली जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ ड अन्वये १०५.७२ चौ.मी.इतक्या जागेचे वार्षिक भाडे र.रु.१२,४७५/- मात्रचे अधिक सेवाकर व प्रतिवर्षी १५% भाडेवाढ करुन वार्षिक भाडेवर वरील नमुद व मनपा. शर्ती व अटीनुसार योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेवून, प्रत्येक ५ वर्षानी जागेचे पुनःमुल्यांकन करुन २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. दिलीप पाटील — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ लोकरे. — महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- ९६६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.१२/०३/२०१५ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील धोकादायक, वठलेली व मुळे उन्मळून पडलेली झाडे तोडून सदरचे लाकूड आमराई उद्यान सांगली येथे एकत्रीत ठेवलेले सर्वसाधारण ६० टन इतके जळावू लाकूड तसेच शाळा नं.१च्या पूर्वेस महापालिका मालकीच्या रस्त्यावर रेन्ट्री झाड असून, सदरचे झाड एक बाजूस झुकलेले असून, सदर झाडांच्या धोकादायक फांद्या तोडून सर्वसाधारण तीन टन इतके लाकूड होत असून, आमराई उद्यानामध्ये वाठविलेल्या जळावू लाकडाच्या व रेन्ट्री झाडाच्या धोकादायक फांद्याचा जाहिर लिलाव करणे देकार र.रु.१ लाख मात्र निश्चित करुन जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्धीचे येणारे खर्चास तसेच, जाहिर लिलाव करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ ठोकडे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.दिलीप पाटील

महापौर,

आयुक्त व प्रशासक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.१२/०३/२०१५ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विभागीय कार्यालय मिरज शहरातील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या चिंच झाडांच्या चिंच फळांचा जाहिर लिलाव करणेस महासभेने देकार र.रु.१,१०,०००/- मात्र निश्चित करुन जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन लिलाव करणेस मान्यता दिली होती. सदर लिलावामध्ये एकूण सहा लिलाव धारकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये श्री.शिवाजी जाधव यांची बोली सर्वात जास्त म्हणजे र.रु.५६,१००/- मात्रची लिलाव बोलीस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा तीनवार अंतरावर अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- मा.दिलीप पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ ठोकळे. महापौर,

आयुक्त

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१३/०३/२०१५ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स्थलसिमेतील पथदीप ऊर्जा बचतीसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA), पूणे यांचेकडून र.रु.२० लक्ष इतके अनुदान मिळणार आहे. सदर कामगिरी अंतर्गत महाऊर्जाच्या नोंदणीकृत ऊर्जा परिक्षण सल्लागार मे.एनर्जिटीक कन्स्लटिंग प्रा.लि.ठाणे यांचे मार्फत स्थलसिमेतील पथदीप ऊर्जा बचतीबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेणेत आलेला आहे. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील ॲटोटायमर व जीएसएम तंत्रज्ञानावर आधारीत पथदीप ऊर्जा बचतीची स्ट्रीट लाईट पॉईंटवर एकूण १५ ठिकाणी १५ उपकरणे पुरविणे व बसविणेत येणार आहेत. यासाठी र.रु.२० लक्ष इतका खर्च अपेक्षित असून, प्रस्तुत कामी महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी (MEDA), पूणे यांचेकडून र.रु.२० लक्ष मात्रचे अनुदान प्राप्त होणेसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA). पूणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.दिलीप पाथीक ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ ठोकळे महापौर,

शहरअभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १६९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.१२/०३/२०१५ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली शहरातील आमराई उद्यानातील चिंच झाडांची चिंच फळे, आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यतच्या चिंच झाडांची चिंच फळे तसेच रि.स.नं.९९/१ मधील गवतांचा वार्षिक लिलाव जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन जाहिर लिलाव करणेस महासभेने मान्यता दिली होती. त्यानुसार लिलाव नोटीस प्रसिद्धीस देवून खालील तपशिला प्रमाणे लिलाव बोलीस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा तीनवार अंतरावर अंतिम मान्यता देत आहे.

अ.क्र.	लिलाव तपशिल	लिलावदार	देकार र.रु.	लिलाव र.रु.
१.	आमराई उद्यानातील चिंच फळे	तौसिफ इस्माईल पठाण	१२००० ते १३०००	११५००/-
२.	आमराई -कॉलेज कॉर्नर व जुने वॉ.व. येथील २ चिंच झाडे	तौसिफ इस्माईल पठाण	९००० ते १००००	७१००/-
३.	रि.स.नं.९९/१ मधील वार्षिक गवत लिलाव	श्री.सुरेश बाबूराव चौगुले	३२००० ते ३५०००	४१०००/-

सूचक :- मा.जगन्नाथ ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.दिलीप पाटील

महापौर,

उद्यान अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सि.स.नं.५९३ व ५९६ ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असून, सदरची जागा बांधा वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर कमर्शियल कॉम्प्लेक्स डेव्हलपर्स श्री.एस.एफ.चौगुले यांनी विकसीत केलेली आहे. सदर इमारतीमध्ये चौथ्या मजल्यावर ऑफिस युनिट बिल्टअपचे असून, अनिता संजय गंगवाणी व श्री.गौतम पांडूरंग पाटील यांनी ८३.२३ चौ.मी. इतके क्षेत्र खरेदी केलेले आहे. सदर क्षेत्रास लागून असलेले खुले टेरेस क्षेत्र ५०६ चौ.मी. श्री.गौतम पांडूरंग पाटील यांनी मागणी केलेले आहे.

महानगरपालिकेच्या मान्यतेने मा.आयुक्तसो यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(ड) मध्ये महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल,पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरण करता येईल तो मोबदला,असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजारभावापेक्षा कमी असता कामा नये. अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यानुसार विषयांकीत जागेची सहा.संचालक नगररचना यांचेकडून भाडे निश्चित करुन घेवून, दर तीन वर्षांनी भाडे पट्टयामध्ये २०% भाडेवाढ करुन २९ वर्षे मुदतीने महानगरपालिकेच्या शर्ती व अटीनुसार जागा भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.दिलिपपाथीड. महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १५१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील जकात कर रद्द करुन स्थानिक संस्थाकर लागू करणेस निर्देश दिलेले आहेत. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमध्ये माहे २२ मे २०१३ पासून महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक संस्था कर प्रणाली लागू करणेत आलेली आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्व्हेनुसार २२२५४ इतकी व्यापाऱ्यांची संख्या आहे. पैकी स्थानिक संस्थाकर प्रणाली अंतर्गत ९९५८ व्यापाऱ्यांनी नोंदणी केलेली आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कर प्रणालीबाबत वेळोवेळी आंदोलन करुन कर भरणेबाबत उदासिनता दाखविलेली आहे. त्याचा परिणाम होवून, महानगरपालिकेस आर्थिक वर्षामध्ये १६२ कोटींची तूट झालेली असून, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती दोलायमान झालेली आहे. सदरचा स्थानिक संस्था कर वसुल करणेकामी तसेच, न्यायालयीन कार्यवाही व कामकाज पूर्ण करणेसाठी ही सभा मा.महापौर प्राधिकृत करीत असून, प्रस्तुत कामी येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

स्था.सं.कर अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे सहाय्यक आयुक्त (क्रिडा विभाग) यांचे दि.१३/०३/२०१५ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे स्थायी समिती सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दि.२४/०२/२०१५ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेनुसार महानगरपालिकेच्या वतीने महापौर केसरी चषक कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेकरीता रुपरेषा ठरविणे व अंदाजे खर्च याबाबत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर महासंघ यांचेशी पत्रव्यवहार केला असता, सदर स्पर्धेकरीता अंदाजे र.रु.१४ लाख मात्र इतका खर्च अपेक्षीत करणेत आला होता. तथापि, स्थायी समिती ठराव क्र.२५९ दि.१२/०३/२०१५ अन्वये महापौर चषक कुस्ती स्पर्धेसाठी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेवून र.रु.१२ लाख मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली होती.

प्रस्तुत कामाची नस्ती मा.आयुक्तसो यांचे निदर्शनास आणली असता, मा.आयुक्तसो यांनी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेवून र.रु.१० लाख पर्यत खर्च मर्यादीत केला असून, त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६ (११) अन्वये ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.स्थायी समितीचे सदस्य मा.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने किशोर -किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा व २५ व्या पुरुष महिला राष्ट्रीय फेडरेशन चषक खो-खो स्पर्धेचे आयोजन करुन, सांगली जिल्ह्यामध्ये प्रथमच होत असलेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या यजमान पदाचा मान घेवून, किशोर -किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा व २५ व्या पुरुष महिला राष्ट्रीय फेडरेशन चषक खो-खो स्पर्धेचे आयोजन करणेत यावे. त्यासाठी खो-खो फेडरेशनची रितसर मान्यता घेणेत येवून, महापौर चषक खो-खो स्पर्धेचे आयोजन करणेस येणारे र.रु.१७ लाख मात्रचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- क्रिडा अधिकारी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली.मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१६ स.नं.२६८/१ ही खुली जागा महानगरपालिका मालकीची असून, सदरची जागा बगीचासाठी आरक्षित आहे. त्यानुसार सदर जागेवर बगीचा विकसीत करणे आवश्यक आहे. यासाठी मा.खासदार रामदासजी आठवले यांनी र.रु.१२ लाख मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेची तयारी दर्शविली असून, याकामी मा.जिल्हा नियोजन अधिकारी यांचेशी पत्रव्यवहार झालेला आहे. सदर निधीतून उद्यान विकसीत करुन सदर उद्यानास "माता रमाई आंबेडकर उद्यान" असे नामकरण करणेकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार ही सभा मान्यता देत असून, पुढील योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर,

शहर अभियंता
सांगली कुपवाड महानगरपालिका

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सांगली शहरातील सि.स.नं.१०८६ मधील ५९४.८७ चौ.मी.ही जागा पेट्रोल पंपासाठी आरक्षित आहे. त्यानुसार सदरची जागा फक्त पेट्रोल पंपासाठीच वापरणेचे महानगरपालिकेचे धोरण आहे.

सदरची जागा मजलेकर & कंपनी या नावाने पेट्रोल पंपासाठी वापरात होती. त्यांनी (Mal Practice) चा गैरप्रकार केलेचे निर्दशनास आल्याने, पेट्रोलियम कंपनीने त्यांची डिलरशिप नाकारली आहे. त्यामुळे सदरची जागा विनावापर पडून असून, कोणतेही जन उपयोगी काम होत नसुन, सदरची जागा देखभाल दुरुस्तींना विनावापर पडून आहे. सदर भाडेकरु यांनी महानगरपालिकेच्या शर्ती अटीचा भंग केला असून, करारपत्रातील अट क्र.१३ भाडेकरुचा कुळ हक्क भाडेपट्टा मुदत संपण्यापूर्वी केंव्हाही रद्द करण्याचा एकतर्फी अधिकार महानगरपालिकेस राहील. त्यानुसार सदरची जागा महानगरपालिकेने करार रद्द करुन जागा ताब्यात घ्यावी. सदर जागेकरीता अनेक कंपन्यांकडून प्रशासनाकडे मागणी आलेली असून, जादा भाडे देण्याची तयारी दर्शविलेली आहे. सदरची जागा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसेच, आर्थिक हिताच्या दृष्टीने नविन कंपनीस भाड्याने दिलेस महानगरपालिकेची मालमत्ता सुस्थितीत राहून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे ही बाब विचारात घेवून सदरची जागा जादा भाडे देणाऱ्या कंपनीस भाड्याने देणेस ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) अन्वये "मा.आयुक्तांस, महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अभिहस्तांतरीत करता येईल." अशी स्पष्ट तरतुद असून, कलम ७९(ड) अन्वये "जो मोबदला घेवून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल,पट्टयाने देता येईल किंवा हस्तांतरण करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला चालू बाजारभावापेक्षा कमी असता कामा न्ये." अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या सांगली येथील सि.स.नं.१०८६ मधील ५९४.८७चौ.मी. ही जागा पेट्रोल पंपासाठी कमर्शियल दराने भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- ७७५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या सर्व विभागाचा कारभार हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये चालविला जातो. नियमाकरीता प्रत्येक विभागाचे उपविधी तयार करणे आवश्यक असतात. तत्कालीन सांगली नगरपालिकेचे उपविधी सद्या उपयोगात आणले जात आहेत. नव्याने उपविधी तयार करुन मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मंजूर उपविधी आधारे नागरीकांना येणाऱ्या समस्या सोडविण्याकामी योग्य धोरण असणे आवश्यक आहे. सद्या मनपाच्या अनेक विभागाचे उपविधी तयार नाहीत. त्यामुळे अनेक कायदेशीर समस्या निर्माण होत असतात. उदा.पाणी पुरवठा विभागाकडील बंद कनेक्शन तोडण्याची कारवाई मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडील उंच होल्डींग,बॅनर परवाने,आरोग्य विभागाकडील व्यवसाय नाहरकत दाखले परवाने तसेच, नगररचना विभागाकडील बांधकाम परवाने, हार्डशिप इत्यादी बाबी उपविधी तयार नसल्याने स्पष्ट स्वरुपात नियम काय आहे यांचे अकलन होत नाही.

मा.आयुक्त व उपायुक्त यांचे नियंत्रणाखाली प्रत्येक विभाग प्रमुख तसेच नगरसचिव यांचे मार्फत सर्व विभागाचे उपविधी तीन महिन्याच्या कालबद्ध नियोजन करुन मा.महासभेस सादर करुन मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा.दिलीप पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.जगन्नाथ ठोकळे. महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मिरज शहरातील मध्यवर्ती असलेल्या महात्मा गांधी उद्यानामधील लाईट व्यवस्था फार खराब होवून उद्यान अंधारात गडप होत आहे. सदर उद्यानामध्ये शाळेची लहान मुले, महिला व जेष्ठ नागरीक मोठ्या गर्दीने सायंकाळी फिरावयास येतात. उद्यानामध्ये असणारी लाईट व्यवस्था खराब झालेली आहे. लाईट नसल्याने उद्यानात गैरसोय होत आहे. उद्याना लगत मिरजेची चावडी व महापालिका कार्यालय अशी महत्वाची कार्यालये आहेत. तरी अंधाराचा गैरफायदा घेवून कोणतेही गैरकृत्य होवू नये यासाठी त्याठिकाणी लाईट व्यवस्था त्वरीत दुरुस्त करणे गरजेचे असलेने, सदर कामी समक्षात पहाणी करुन मान्यतेसाठी सविस्तर अहवाल सादर करणेत यावा.

सूचक :- मा.अजिनाथ ढोकरे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.दिलीप पाटील

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची मिरज शहरातील ऑक्सीडेंटल प्लॅट (कत्तलखाना जवळील) येथील अंदाजे ३० एकर जमीन प्रत्येक तीन वर्षासाठी भाडे तत्वावर जाहिर लिलाव करुन कसण्यासाठी देणेत येत होती.सदर शेत जमीन कसण्यासाठीची मुदत संपलेली आहे. जमिनीचा कसण्यासाठीचा लिलाव काढला गेलेला नाही. सद्या सदरची जमिन ही पडीक पडलेली आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न बुडत आहे. सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब झालेली असलेने, महापालिकेला आर्थिक उत्पन्नाची गरज आहे. असे असताना सदर जमीन कसण्यासाठी न दिलेने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सदर जमिन कसणेस देणेसाठी महापालिका प्रशासनाचे काय धोरण आहे. याबाबत अद्याप जाहिर लिलाव काढण्यात आलेला नाही सदरचा प्रस्ताव महापालिकेच्या आर्थिक हिताशी संबधीत असलेने, याकामी अहवाल सत्वर सादर करणेत यावा.

सूचक :- मा. दिलीप पाटील

अनुमोदक :- मा. जगन्नाथ ठोकडे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

जलनिस्सारण अभियंता.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १९/०३/२०१५

ठराव क्रमांक :- १७८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील हॉटमिक्स रस्ते करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत येत असतात. सदरच्या निविदा मागविताना महानगरपालिकेच्या शर्ती अटीमध्ये २० किमी.चे आत हॉटमिक्सचे प्लॅन्ट असणे आवश्यक आहे. अशी अट प्रामुख्याने नमुद केली जाते. त्यामुळे महापालिकेच्या नोंदणीकृत हॉटमिक्स प्लॅन्ट नसणाऱ्या मक्तेदारांना निविदेमध्ये भाग घेता येत नाही. ज्या मक्तेदारांची हॉटमिक्स प्लॅन्ट आहेत अशा मक्तेदारांची साखळी निर्माण होवून काही वेळेस निविदा दर एस्टीमेट पेक्षा जादा दराने येत असतात व काही वेळा मक्तेदारात स्पर्धा होवून कामगिरीचे दर कमी येत असतात. मक्तेदारांनी कमी दर दिल्याने कामगिरीची वर्क ऑर्डर न स्विकारणे, कामगिरी वेळेत पूर्ण न करणे, कामगिरी परवडत नाही म्हणून दरवाढ मागणे इत्यादी कारण मिमांसा पुढे करुन कामगिरी करणेस दिरंगाई केली जाते. ही वस्तुस्थिती विचारात घेवून महापालिका क्षेत्रातील हॉटमिक्स रस्त्यांची निविदा काढताना २० किमी अंतराची अट रद्द केलेस, सदर निविदा प्रक्रिया मध्ये सर्व मक्तेदार निविदा शर्ती अटीमध्ये भाग घेवून स्पर्धात्मक दर प्राप्त होवून महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, महानगरपालिका क्षेत्रातील हॉटमिक्स रस्त्यांची निविदा काढताना निविदा शर्ती अटी मध्ये २० किमी चे आत हॉटमिक्स प्लॅन्ट असणे ही अट रद्द करणेत येत आहे. तसेच, विविध विकास कामासाठी २०% पेक्षा कमी दराने निविदा दर आल्यास त्यासाठी ठेकेदाराकडून १५% आगाऊ रक्कम डिपॉझीट म्हणून भरुन घेण्याची सक्ती केली जात आहे. त्यामुळे अगोदरच कमी दराने निविदा भरलेल्या ठेकेदारांना वाढीव डिपॉझीट भरणे शक्य होत नाही. त्यामुळे ठेकेदार काम मंजूरी नंतर समज व वर्क ऑर्डर घेण्यास येत नाहीत व त्यामुळे विकास कामाचा खोळंबा होतो असतो. सबबीचा विचार करुन कमी दराने निविदा दर भरलेल्या ठेकेदारांना १५% डिपॉझीट भरणेची अटही रद्द करण्यात येत आहे.

शहर अभियंता

महापालिका क्षेत्र सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,